निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३२ वा.
रविवार :२६ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** शीख पंथाचे ९ वे गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य हे केवळ शीख पंथीयांसाठी नव्हे, तर संपूर्ण भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गुरु तेग बहादुर यांच्या हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर पोहोचविण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर' यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त दादर येथील योगी सभागृहात राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार बाबू सिंह महाराज, अल्पसंख्याक विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, संत ज्ञानी हरनाम सिंघजी (खालसा भिंदरनवाले मुखी दमदमी टकसाल, प्रधान सत समाज), राज्यस्तरीय समितीचे रामेश्वर नाईक, सरताज सतींदर, महंत सुनील महाराज, स्वामी हिरानंद, प्रसिद्ध गायक सतेंदर सरताज आदींसह विविध सहा समाजाचे संत, गुरू आणि समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुरु तेग बहादुर यांनी भारतातील सर्व धर्मीयांच्या रक्षणासाठी बलिदान दिले आहे. म्हणूनच त्यांना 'खालसा दी चादर' नव्हे तर 'हिंद दी चादर' म्हटले गेले. त्यांनी धर्मांतरास विरोध करत भारताच्या संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नांदेड, नागपूरसह मुंबईत शहिदी समागमनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.




मुख्यमंत्री म्हणाले की, गुरूबाणी ही जगातील एक अशी अनोखी रचना आहे ज्यात केवळ शीख गुरूंचेच नव्हे तर संत नामदेवांचे आणि विविध पंथांचे चांगले विचार समाविष्ट आहेत. सर्व चांगल्या विचारांना सोबत घेऊन जीवनाचा मार्ग दाखवणारी ही गुरूबाणी आपल्याला जोडण्याचे काम करते. या कार्यक्रमानिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले आहेत.

## दिवाळीच्या सुट्ट्यामुळे वेरूळलेणी पर्यटकांच्या गर्दीने हाऊस फुल्ल

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरासह विविध देवस्थानांमध्ये आणि धार्मिक स्थळांवर दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत,जसे की खुलताबाद भद्रा मारुती मंदिर.दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे वेरूळ मध्ये गर्दी वाढली आहे, वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर येथे सात दिवसांत सुमारे ३ लाख भाविकांनी घृष्णेश्वरचे दर्शन घे-तले.अशी माहिती घृष्णेश्वर देवस्थानाचे अध्यक्ष कुणाल दांडगे यांनी दिली दर्शनासाठी शनिवारी पहाटे पासूनच भाविकाच्या घृष्णेश्वरचे दर्शनासाठी भर पावसात लांब रांगा लागल्या होत्या.वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग मंदिर:पहाटे पासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या आहेत आणि भाविक 'हर हर महादेव' व 'ओम नमः शिवाय' अशा घोषणा देत आहेत.खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक पर्यटनासाठी बाहेर पडला असल्याने जगप्रसिध्द वेरूळ लेणी परिसर पर्यटकांच्या गर्दीने आज शनिवारी हाऊसफुल्ल झाला आहे. वेरूळ लेणी बरोबरच दौलताबाद, बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर व खुलताबाद भद्रा मारूती मंदीरातही मोठी गर्दी होत आहे.पर्यटनावर आधारित उद्य-ोग व्यावसायिक आनंदी दिसत आहे. गेल्या दोन दिवसांपासून वाढत्यागर्दीमुळे वेरूळ घाट ते वेरूळ गावापर्यंत सतत ट्रॅफीक जाम होत आहे.दिपावलीच्या सुट्ट्यामुळे देशभरातील पर्यटक पर्यटनासाठी बाहेर पडला असल्याने सर्वच पर्यटन व धार्मिक स्थळा-वर पर्यटकांची मोठी गर्दी दोन दिवसापासून दिसत आहे.शनिवार पर्यटकांच्या हाऊस फुल्ल गर्दीने वेरूळ लेणी,दौलताबाद देवगिरी किल्ला, बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदीर,खुलताबाद येथील भद्रा मारूती मंदीरात पर्यटक व भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

**वाहतुकीच्या कोंडीमुळे वेरूळ घाट ते वेरूळ गाव रस्ता जाम**

सकाळपासूनच लेणी बघण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत असल्याने तिकिटघरावर एकाच वेळी पर्यटकांची गर्दी बघावयास मिळत होती.

पर्यटकांच्या गर्दीने वाहनतळात वाहने लावण्यास जागा मिळत नसल्याने अनेकांनी रस्त्यावर वाहने उभी केली होती. त्याचबरोबर वाहनांच्या गर्दीने लेणी समोर तसेच वेरूळ-खुलताबाद घाटात ट्रॅफीक जाम होण्याचा प्रकार घडत होता.त्यामुळे मोठी गैरसोय पर्यटक व भाविकांची होत आहे. पर्यटकांच्या गर्दीने अनेक व्यावसायिक खुश होते,लॉज, हॉटेलात गर्दी दिसत आहे. दौलताबाद देवगिरी किल्ला,भद्रा मारूती मंदीर, घृष्णेश्वर मंदीर भाविकांच्या गर्दीने फुलून गेली होते.दिव-ाळी पासून पर्यटन हंगाम सुरू झाला असून फेब्रुवारी पर्यंत असाच राहील असे काही व्यावसायिकांनी सांगितले.

वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरात शनिवारी देशभरातील विविध राज्यातून भगवान महादेवाचे दर्शनासाठी आलेले भाविकांना मंदिर परिसरात लाईट नसल्यामुळे महावितरणच्या विरोधात नाराजगी व्यक्त करताना दिसत होते मंदिर परिसरात विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे.. असे धार्मिक परिसरात लाईट नसल्यामुळे भाविकांना रात्रीच्या वेळी त्रास त्रास सहन करावा लागले होतो,कारण त्यांना मंदिरात जाण्यासाठी अंधारातून जावे लागते आणि यामुळे गैरसोय होते.

या समस्येवर मात करण्यासाठी, स्थानिक प्रशासन व मंदिर देवस्थान समितीने प्रकाश व्यवस्थेची सोय करावी,जेणेकरून भाविकांना रात्रीही दर्शन घेणे सोपे होईल* अशावेळी महिलाचे मंगळसूत्र व पाकीट चोरीचे प्रकार घडू शकते याची दक्षता घेणे गरजेचे आहे असे अनुचित प्रकार घडू नाही म्हणून खबरदारी घेण्याचे जबाबदारी महावितरण विभागाचे आहे.



वेरूळ लेणी समोर अनेक भागांत अनधिकृत हॉटेल रस्त्यावर थाटल्याचे दिसून येतात.हे ज्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी वारंवार होत.या पार्श्वभूमीवर.विशेष सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने धोरण तयार केले होते यासंदर्भात महामार्ग पोलिसांनाही वेळो-वेळी कारवाईच्या सूचना दिल्या आहेत.मात्र दोन्ही प्रशासनांकडून ठोस कारवाई केली जात नसल्यामुळे समस्या अधिक वाढली आहे असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे..लेणी समोर महावीर स्तंभ येथे रस्ता अडवून हॉटेल व्यवसाय सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे इतर वाहनांना मार्ग मिळत नसल्याने या परिसरात प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

## केंद्रीय संचार ब्युरो च्या वतीने स्वच्छता ही सेवा,विद्यार्थी रॅली व कलापथक जनजागृती कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**अर्धापूर / प्रतिनिधी /** ऑक्टोबर महिना हा जागतिक हात धुवा दीन म्हणून साजरा केला जातो या दिनाचे औचित्य साधून माहिती आणि प्रस-ारण मंत्रालय भारत सरकार च्या केंद्रीय संचार ब्युरो यांच्या वतीने नांदेड तालुक्यातील मौजे बळीरामपुर येथे स्वच्छतेवर आधारित विशेष प्रसिद्धी कार्यक्रम करण्यात आला.

या कार्यक्रमाला स्वच्छ भारत कक्षा ची माहिती शिक्षण व संवाद तज्ञ मिलिंदजी व्यवहारे, केंद्रीय संचार ब्युरो नांदेडचे प्रसिद्धीप्रमुख सुमित दोडल, पंचायत समिती विस्तार अधिकारी नांदेड व्हि.बी.कांबळे, आर.पी.केंद्रे, डॉ. विवेक पदमने ,सरपंच इंद्रजीत पांचाळ, ग्रामविकास अधिकारी शारदा आळ-णे, महात्मा फुले शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर पवळे, पो.पा. बुद्धेवार व संदीप डुमणे आदी मान्यवर उपस्थित होते .




या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची रॅली काढून स्वच्छतेचे महत्त्व, हात धुण्याचे फायदे, स्वच्छ राहण्याचे व स्वच्छता ठेवण्यासाठी काय केलं पाहिजे व कसे राहीले पाहिजे आदि सर्वांबाबत कला पथका मार्फत महत्त्वाची जनजागृती पथकाचे चालक शिक्षक बापुराव जमदाडे व त्यांच्या संचाने यशस्वीरित्या कामगिरी करून हा कार्यक्रम नियोजनबद्ध रितीने संपन्न केला.




अंबड चौफुली येथे बंजारा समाजाला एस.टी. प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या उपोषणकर्ते विजय चव्हाण यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केली.त्यांच्या उपोषणाचा आज आठवा दिवस असून प्रकृती खालावलेली आहे. या गंभीर परिस्थितीकडे शासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.या संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करून सकारात्मक तोडगा निघण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू असा विश्वास दानवे यांनी व्यक्त केला.

## जरंडी ग्रामपंचायतीची बांबूची शेती,लोकसहभागातून उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी** / गावाच्या विकासा सोबतच शेतीशी नाळ जोडून जरंडी ग्रामपंचायतीने बटाई ने शेती करून दोन एकर क्षेत्रात बांबूच्या रोपांची लागवड केली शेतीच्या सोबत स्मशानभूमीत व हुतात्मा राजहंस स्मारकात ही दोन हजार पाचशे बांबूच्या रोपांची शनिवारी लागवड केली दरम्यान ग्रामपंचायतिचा बांबू शेतातून येणाऱ्या उत्पन्नातून गावाचा चे-हरा मोहरा बदलविण्याचा संकल्प ग्रामपंचायतीने केला आहे सरपंच स्वातीताई पाटील,उपसरपंच संजय पाटील,ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला आहे लोकसहभागातून ग्रामपंचायतने बांबुची शेती



हा राज्यातील पहिला एकमेव प्रकल्प ठरला आहे दरम्यान बटाईने ग्रामपंचायत ने यापूर्वीही आंब्याची व शेवग्याची शेती केली आहे यातून मिळालेल्या उत्पन्नातून गावाचा विकास साधण्याची किमया जरंडी ग्रामपंचायतीने साधली आहे.

**लोकसहभागातूनच मशागत**

दरम्यान ग्रामपंचायतने कसलेल्या बांबूच्या शे-तीची मशागत लोकसहभागातून करण्यात येणार आहे असे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी सांगितले आहे दररोज एक जण शेती वर मशागत व देखभाल करण्यासाठी जाणार आहे ग्रामपंचायत कर्मचारी या बांबूच्या शेतीवर लक्ष केंद्रित करतील असे सरपंच स्वाती ताई पाटील यांनी सांगितले.

## डॉ संपदा मुंडे प्रकरणात दोषींवर कठोर कार्यवाही करा.. केज येथे झाला रस्ता रोको

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** वैद्यकीय अधिकारी डॉ संपदा मुंडेंची आत्महत्या ही नीतिमूल्ये हरवलेल्या प्रशासकीय व्यवस्थेचे प्रदर्शन असून सामान्य कुटुंबातील या उच्च शिक्षित डॉक्टर तरुणीची आत्महत्या समाजाला चिंतेत टाकणारी व भयभीत करणारी आहे. डॉ संपदाच्या आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्या पोलिस अधिकारी, राजकीय लोकप्रतिनिधी व इतर संबंधितावर गुन्हे दाखल करून कठोर कार्यवाही करा या मागणीसाठी शनिवारी सकाळी केज येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात केज विकास संघर्ष समिती, शेकाप व इतर सामाजिक संघटनांच्या वतीने रस्ता करण्यात आला.

डॉ संपदा मुंडे या फलटण येथे उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी कार्यरत होत्या. याठिकाणी त्यांना आरोपीच्या फिटनेस प्रमाणपत्रावरून पोलिस अधिकारी, खासदार लोकप्रतिनिधी व इतर लोकांकडून प्रचंड दबाव टाकला जात होता. यासाठी त्यांचा लैंगिक, मानसिक व शारीरिक छळ केला जात असल्याचे त्यांनी नमूद केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. यावरून सध्या सर्वच क्षेत्रात सेवा करणाऱ्या महिलांच्या समस्या आल्या आहेत.

सध्या वैद्यकीय डॉक्टर बनून बहुतांश तरुण तरुणी मोठ्या शहरात मोठी हॉस्पिटल उभी करून सेवा देतात. मात्र डॉ संपदा ही सामान्य कुटुंबातील मुलगी होती. एमबीबीएस सारख्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊनही ती फलटण सारख्या ग्रामीण भागात वैद्यकीय अधिकारी म्हणून गरीब जनतेची सेवा करत होती. ती श्रीमंतांची लेक असती तर तिने पुढील शिक्षण घेऊन मोठे हॉस्पिटल टाकले असते.ती महाराष्ट्रातील सामान्य व गरीब कुटुंबाची प्रतिनिधी होती. डॉ संपदा ने वरिष्ठांना



आपल्याला होत असलेल्या त्रासाबद्दल कळवले होते. त्याचवेळी तिच्या तक्रारीची दखल घेतली असती तर कदाचित तिचा जीव वाचला असता.

ही घटना अत्यंत गंभीर व तितकीच अस्वस्थ व चिंतेत टाकणारी आहे. या घटनेतील सर्व दोषी लोकांवर चौकशी करून कार्यवाही करावी व दोषींना कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी यावेळी आंदोलकांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, भाई मोहन गुंड, महेश जाजू, नासेर मुंडे व इतर नागरिकांच्या वतीने करण्यात आले. केज पोलिसांनी आंदोलनकर्त्यांच्या वतीने निवेदन स्वीकारले.

# शासनकर्ती जमात : स्वाभिमानाचा प्रवास आणि संघर्षाचा संकल्प

भारतात आज प्रत्येक घटक सत्तेच्या केंद्रात पोहोचण्याची आकांक्षा बाळगतो. पण शासनकर्ती जमात बनणे म्हणजे केवळ निवडणुकीत जिंकणे नाही, तर विचाराने, संघटनाने आणि आत्मभानाने समाजाला दिशा देणे होय. केवळ संख्या नाही, तर सामर्थ्य, एकजूट आणि जागृती हाच खरा सत्तेचा पाया आहे. कारण संख्येने मोठे असणे पुरेसे नाही, विचाराने, संघटनेने आणि कृतीने सक्षम बनल्याशिवाय सत्ता हातात येत नाही. अंतर्गत मतभेद आणि उपगटवाद जे थांबवतात प्रवास. आपला समाज उपजतच विभागला गेला आहे. जात, पंथ, संस्था आणि अहंकार यांच्या भिंतींनी. आपण सारे एक ही भावना अजूनही कृतीत उतरलेली नाही.

नेतृत्वाचा अभाव आणि सत्तालालसा मुळे खरे लोकनेते मागे पडतात, संधीसाधू पुढे येतात. नेतृत्व ही जबाबदारी नव्हे तर प्रतिष्ठेची जागा बनली आहे. जनतेचा विश्वास या स्वार्थी खेळांमुळे हरवत चालला आहे. शिक्षण आणि अर्थव्यवस्थेतील कमजोरीमुळे शासन हे ज्ञानावर आणि संपन्नतेवर उभे असते.

शिक्षणाचा प्रकाश आणि आर्थिक स्वावलंबन हेच सत्तेचे खरे शस्त्र आहेत. जे आजही अनेकांना न मिळाल्याने समाज निर्णयक्षम होत नाही. धर्म, भाषा, प्रांत आणि जातीच्या नावाखाली समाजात फूट पाडली जाते. एकजूट मोडली की सत्ता हातातून निसटते. आपण सत्तेसाठी जन्मलो नाही ही मानसिक गुलामी अजूनही टिकून आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला नाही तर इतर आपल्या भविष्यावर नियंत्रण ठेवतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्रिसूत्रीची आज सर्वाधिक गरज आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. विचारशक्ती आणि विवेक विकसित केला तर कोणताही समाज झुकत नाही. सत्ता टिकवायची असेल तर आर्थिक स्वातंत्र्य अनिवार्य आहे. उद्यमशीलता, तंत्रज्ञान आणि व्यवसाय यात सहभाग वाढवावे लागेल.

वैयक्तिक महत्वाकांक्षा बाजूला ठेवा. सामूहिक विचार, सामूहिक निर्णय आणि सामूहिक नेतृत्व यांवर भर द्यावे लागेल. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक गावात संघटनाचे बी पेरा. वाचनसंस्कृती, संवाद आणि बौद्धिक प्रबोधन वाढवावे लागेल. आपल्यात नेतृत्व करण्याची क्षमता आहे, हे प्रत्येकाने जाणले पाहिजे. आत्मसन्मानाचा जाज्वल्य भाव निर्माण झाला की सत्ता आपोआप आकर्षित होते.

शासनकर्ती जमात होणे हा प्रवास एका पिढीचा नाही, तर शतकांचा संघर्ष आहे. पण या संघर्षात जर आपण विचार, संघटन आणि आर्थिक बळ या त्रिसूत्रीला स्वीकारले, तर तो दिवस दूर नाही, जेव्हा आपण केवळ मतदार नव्हे, तर सत्ताधारी आणि निर्णयकर्ते म्हणून इतिहास लिहू.

# खडकाळ माळरानावर वनराई फुलवणारा अवलिया: शिवसांब घोडके

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील पानभोसी या छोट्याशा गावात दररोज हिरव्या स्वप्नांची लागवड करणारा एक हरित सैनिक आज संपूर्ण महाराष्ट्राचा प्रेरणास्थान बनला आहे. हा हरित सैनिक म्हणजेच वनरक्षक शिवसांब बाबुराव घोडके होय. ते पानभोसीचे वृक्षपुरुष म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्र वनविभागातील राज्यस्तरीय सुवर्णपदक विजेते आणि 'दररोज एक रोप'या अद्वितीय चळवळीचे ते प्रणेते आहेत.

२७ ऑक्टोबर २०२१ हा दिवस घोडके यांच्या आयुष्यातील आणि पर्यावरणाच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा ठरला. स्वतःच्या वाढदिवशी केक न कापता, फटाके न फोडता त्यांनी एका वटवृक्षाचं रोप लावलं आणि मनाशी एक ठाम संकल्प केला. दररोज एक रोप लावायचंच. तेही अखंडपणे. या एका छोट्या कृतीतून जन्म झाला'दररोज एक रोप' या चळवळीचा जी आता हरित भारताचं प्रतीक बनली आहे. घोडके यांनी १४०० दिवस अखंडपणे, म्हणजेच एकही दिवस न चुकवता, दररोज एक नवीन रोप लावलं आहे. आजपर्यंत त्यांनी २३,००० पेक्षा अधिक झाडं लावून त्यांचं संगोपन केलं आहे. ही झाडं केवळ आकडेवारी नाहीत, तर त्यांच्या आयुष्याचं सार आहे. प्रत्येक झाडाचं नाव, स्थान, आणि काळजी घेणारा'सेवक' ठरवलेला आहे. या चळवळीमुळे पानभोसी गाव आणि परिसरातील सिद्धेश्वर महादेव मंदिर माळ आज हिरवाईने नटलेली आहे. जिथे पूर्वी खडकाळ माळरान होतं, तिथे आता वाऱ्याबरोबर फुलांचा सुगंध वाहतो, पक्ष्यांचा कलरव ऐकू येतो.

प्रारंभी घोडके यांनी ही चळवळ एकट्याने सुरू केली. लोकांना वाटलं की, ही जोशाची गोष्ट काही दिवसांचीच. परंतु त्यांच्या चिकाटीने, सातत्याने आणि मनापासून केलेल्या प्रयत्नांमुळे ही चळवळ गावोगावी पोहोचली. त्यांनी निसर्ग सेवा गट पानभोसी स्थापन केला आणि आज महाराष्ट्रातील अनेक पर्यावरणप्रेमी या गटाशी जोडले गेले आहेत. गावात लग्न असो, वाढदिवस असो, किंवा कोणतंही शुभकार्य प्रत्येक प्रसंग झाडाशी जोडला गेला आहे. आज पानभोसीत वधू-वरांच्या हस्ते झाड लावणं, वाढदिवसाला रोप लावणं, स्मृतिदिनी वृक्षारोपण हे एक संस्कार बनले आहेत. घोडके यांच्या माळावर आणि आसपासच्या परिसरात आज ३५० पेक्षा अधिक देशी व औषधी वनस्पतींच्या प्रजाती फुलल्या आहेत. त्यात वड, पिंपळ, आंबा, बोर, चिंच, जांभूळ, कवठ, आपटा, भोकर, चारोळी, टेटु, बिब्बा अशा अनेक



स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. सिद्धेश्वर महादेव मंदिर माळावरच ६,००० झाडं, पोलीस स्थानक माळाकोळी येथे ४,५०० झाडं, तर अहमदपूरच्या आश्रमातही मोठ्या प्रमाणावर वृक्षसंवर्धन होत आहे. ही सर्व ठिकाणं आता निसर्गाचे हरित संग्रहालय बनली आहेत.

दररोज झाडं लावणं एवढंच नाही, तर ती जगवणं हेच खरं आव्हान आहे. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई, जनावरांकडून झाडांची हानी, काही ठिकाणी विरोध या सर्व समस्यांवर घोडके यांनी संयम आणि शिस्त यांचा आधार घेतला. ते स्वतः सांगतात, पहिल्या काही महिन्यांत १५० झाडं उकडून फेकली गेली. पण दुसऱ्याच दिवशी मी तितकीच नवी झाडं लावली. माझं वचन पवित्र होतं. एकही दिवस रोपाविना जाणार नाही. गावकऱ्यांच्या मदतीने बोरवेल आणि ठिबक प्रणाली बसवून पाण्याची व्यवस्था करण्यात आली. आज त्या माळावर वाळवंट नव्हे, तर हरित ओॲसिस फुलली आहे. घोडके यांना वाटतं की, केवळ झाडं लावणं पुरेसं नाही, तर लोकांना त्यांचं वैज्ञानिक महत्त्व समजावणं आवश्यक आहे. यासाठी त्यांनी सिद्धेश्वर माळावर निसर्ग अभ्यासिका व निसर्ग ग्रंथालय सुरू केलं. इथं पर्यावरण, औषधी वनस्पती, शेती आणि जैवविविधतेवरील शेकडो पुस्तके उपलब्ध आहेत. अभ्यासिकेचा अनोखा नियम आहे. 'झाड लावा आणि पुस्तक वाचा!' ज्ञान आणि निसर्ग, दोन्हींचं संगोपन हेच त्यांचं ध्येय आहे. घोडके यांच्या पर्यावरण कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे. त्यांना २०१४ आणि २०१८-१९ या दोन्ही वर्षांत महाराष्ट्र शासनाचं राज्यस्तरीय सुवर्णपदक मिळालं, तेही मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते दिला आहे.**- राजेश्वर कांबळे**

## समाजसेवक शेख हमीद यांना नगराध्यक्ष पदाची संधी द्यावी

### माजलगाव शहरातील सर्वसामान्य जनतेची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगांव/प्रतिनिधी/** राज्यातील नगरपालिका व नगरपंचायत नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची घोषणा झाली त्यामध्ये माजलगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष इतर मागासवर्गीय महिला प्रवर्ग म्हणून राखीव झाले. जनतेचे सेवक म्हणून ओळखले जाणारे समाजसेवक व सर्वसामान्यांसाठी अहो रात्र राबणारे लोकसेवा संकल्प सामाजिक प्रतिष्ठान व कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांना शासनाच्या विविध कामगारांसाठी असलेले योजना कामगारापर्यंत पोहोचविणारे व रुग्णसेवक म्हणून ओळखले जाणारे सामाजिक कार्यात अग्रेस असलेले तसेच सामान्यांच्या प्रश्नांसाठी गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात भावपूर्ण करत सर्वसामान्य लाभ कसे मिळवता येईल व शासनाकडून विविध योजनांचे सर्वसामान्यांना हक्काने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे माजलगाव शहरातील परिचित धडाडीचे पत्रकार श्री शेख हमीद आहे



माजलगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद इतर मागासवर्गीय महिलेसाठी राखीव होणे आणि सर्व शहरातील सर्वसामान्य नागरिक यांचे पाठबळ तितकेच महत्त्वाचे ठरत आहे विशेष करून शेख हमीद यांना कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकीय वारसा नसून हे व्यक्ती एक सर्वसामान्य कुटुंबातील सुशिक्षित आहे व आपल्या कार्यशैली तून लोकांच्या मनातला नगराध्यक्ष पदाचा दावेदार आहे असे सर्वसामान्य जनतेतून कुजबूज होत आहे.

# विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका 'लक्ष्या'

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म ७१ वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# भाऊबीज स्रीजातीला स्वतंत्र्य दर्जा मिळवून देऊ शकतो काय?

भाऊबीज स्रीजातीला स्वतंत्र्य दर्जा मिळवून देवू शकते काय? असा जर विचार केल्यास त्याचं उत्तर नाही असंच आहे. कारण आजपर्यंत भाऊबीज झाल्या. बहिणीनं भावाला ओवाळलं. परंतू ना समाजप्रबोधन झालं. ना समाज पूर्ण रितीनं बदलला.

प्रत्येक वेळी भाऊबीज साजरी होते. प्रत्येक मुलीला आपल्या भावाला ओवाळतांना आनंद होतो. बहिण आपली मानसिकता सोडून भावाला ओवाळतेही. कदाचित भाऊ पुढील जन्माचा संकटात सोबती होईल यासाठी.

आजपर्यंत याच उद्देशानं ह्या भाऊबीजा साज-या झाल्यात. बहिणीनं भावाला ओवाळलं. त्याच्या लांब आयुष्याची प्रार्थना केली. परंतू भावानं तिच्या भावना ओळखून आजपर्यंतच्या आयुष्यात तिच्या मागण्या कधीच पुर्ण केल्या नाहीत. तिला स्वतंत्र्य दर्जा कधीच प्रदान केला नाही किंवा तिला राजसुख दिले नाही. त्यातच तिचे वेडेवाकडे पाऊल राज्याला घातक समजून तिचा पावलोपावली छळच केला. विवाहानंतरही तिला तिच्या पतीच्या शय्येवर सती जातांना कधी तिला रोखले नाही वा जाणूनबुजून तिला सासरचे लोकं सती देत होते, तेव्हाही त्याचा त्यानं विरोध केला नाही.

स्री जात........ स्री जातीला पुर्वीपासून हिनच मानलं गेलं. तिच्या उठण्याबसण्यावर फार कडक बंधन घातली गेली. तिच्या मनाला बांधील केलं गेलं. तिनं कोणत्याही संकटाच्या समयी कितीही धैर्य दाखवलं तरी तिची किंमत झाली नाही. त्यातच तिला अर्धांगीनी न मानता तिला दोष देत तिला उपेक्षीत जीवन जगायला भाग पाडलं गेलं.

राज्यातील महत्वाचे विषय. राज्यातील महत्वाचे प्रसंग. परंतू या महत्वाच्या प्रसंगावरही स्रीयांच्या नशीबी दुःखच होतं. कोणत्याही महत्वाच्या विषयावर स्रीया कितीही हुशार असल्या तरी त्यांचे निर्णय राजा विचारात घेत नसे नव्हे तर कोणत्याही कठीण प्रसंगात राजा स्रीयांना दुय्यम स्थानच द्यायचा.

युद्ध असो की अजून कोणती परीस्थीती. राजाला देव मानून प्रजा त्याच्या उलट्यासुलट्या गोष्टीवरही विश्वास ठेवत असे. त्यातच समजा कधी दुष्काळाची परीस्थीती आली तर त्या दुष्काळी परीस्थीतीसाठीही राजा स्रीयांनाच दोषी ठरवत असे.

स्वयंवराची पद्धत होती. परंतू या स्वयंवरात राजाचीच इच्छा चालत असे. स्वयंवरापुर्वी दूरदूरच्या राज्यात विवाहाचे (स्वयंवराचे) निमंत्रण पाठवले जाई. त्यातच त्या स्वयंवराला दुरदूरची मंडळी हजेरी लावत. जे हजेरी लावत. त्या राजाची आणि राज्याची माहिती राजा आपल्या सुमंताकरवी वा भाटाकरवी प्राप्त करीत असत. त्यातच ती माहिती प्राप्त होताच राजा आपल्या मुलींसोबत आपल्या चर्चा करीत असे आणि बजावून सांगत असे की तिनं कोणाच्या गळ्यात वरमाला घालावी वा कोण तिच्या लायक आहे. त्यानंतर स्वयंवर होत असे. स्वयंवरात पैजा लागत असत. त्यातच जो राजा या स्वयंवरात पैज जिंकला. त्याच्या गळ्यात ती राजकन्या वरमाला टाकून विवाह करीत असे.

विवाह करतांना स्वयंवरात राजानं बजावून सांगीतल्यामुळे विवाह तो राजा पैज जरी जिंकला असला तरी राजकन्या करीत नसत. उदाहरण द्यायचं झालं तर कर्णाचं देता येईल. कर्ण हा सुतपुत्र जरी नसला तरी त्याचा परीचय केवळ अधिरथाच्या घरी तो वाढत असल्यानं व त्याची कल्पना खुद्द द्रोपदीला असल्यानं तो जरी स्वयंवराची पैज जिंकला असला तरी त्याच्याशी स्वयंवर जिंकल्यावरही द्रोपदीनं विवाह केला नाही. त्याच्याशी विवाह वृषालीला करावा लागला. तसेच दुर्योधनानं स्वयंवराची पैज जिंकली असतांनाही भानुप्रियानं नकार दिला होता. परंतू दुर्योधनानं बलाचा वापर करुन जबरदस्तीनं तिच्याशी विवाह केला. त्यातच आपल्या प्रिय भावासाठी भिष्मानंही स्वयंवर जिंकला आणि इच्छा असतांनाही अंबा, अंबिका अंबालिकांना भिष्माशी विवाह करता आला नाही.

मुळात स्री इच्छा विवाहप्रसंगी चालत नव्हतीच. रुख्मीनीलाही विवाह करतांना पळून जावं लागलं. त्यातच विवाहयोग्य वर निवडतांना आपल्या भावाचा रोष पत्करावा लागला होता. त्यातच शुभद्रेला आपल्या भावाच्या मदतीनं पळून जावं लागलं.

संपत्तीचाही अधिकार स्रीयांना पुर्वीपासूनच नव्हता. तिनं कमावलेलं स्री धन हे तिचं न राहता ते पुरुषांचंच असायचं नव्हे तर तिच्या धनावर पुरुषांचाच हक्क असायचा. ती आपलं धन स्वतःवर पुरुषांच्या परवानगीशिवाय खर्च करु शकत नव्हती. हे स्रीधन मग तो पुरुष पिता असेल तर पित्याच्या स्वाधीन करीत असे. तो जर पती असेल तर पतीच्या आणि तो जर पुत्र असेल तर पुत्राच्या.

स्री जन्माबाबतही समाजात उदासीनता होती. जर स्रीयांनी स्री भ्रृणांना जन्म दिला तर दुषणे लावली जायची. त्यातच स्री भ्रृणांना निसर्गतः नष्ट करण्याचं कार्यही याच संस्कृतीनं पुर्वीपासून केलं असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. तसेच हा भ्रृण जन्मास आलाच आणि पुढं राज्यावर कोणतं संकट आल्यास त्याला जबाबदार याच स्री भ्रृणालाच पकडल्या जात असे. त्या स्री भ्रृणाच्या जन्माचा काहीही दोष नसतांनाही. असा दोष दिसलाच तर त्या स्रीयांना मग त्या सख्ख्या मुली का असेना राजा त्यांना दुःख न बाळगता दुस-यांना दान म्हणून देवून टाकत असे वा ठार करुन टाकत असे. स्रीयांना बोलण्याचा पाहिजे त्या प्रमाणात अधिकार नव्हता.

स्रीयांना आपल्या परीवारात काम करतांनाही मनाईच होती. तिला पुरुषांच्याच मर्जीनं काम करावं लागत असे. तिच्या मर्जीनं कामं करायला मनाई होती. जर तिनं पुरुषांच्या मर्जीनं कामं केली नाहीत, तर तिला जबर शिक्षा होई. त्यातच तिचे अवयव कापण्याचीही शिक्षा होत असे. तिचा दोष पाहिजे त्या प्रमाणात नसतांनाही.

स्रीयांना पुरुष मृत्यूवेळीही सोडलेले नव्हते. समजा पुरुष असलेल्या तिच्या पतीचा मृत्यू झालाच तर तिलाही त्या पुरुषांसोबत सती देण्याची पद्धत होती. त्यातच तिची इच्छा असो वा नसो. अशा कितीतरी स्रीया काळानं पुरुष निधनानंतर हिरावल्या होत्या.

रजस्वला स्रीयांना मंदिरप्रवेश नव्हताच. समजा अशी स्री एखाद्या वेळी मंदिरात गेली आणि ते जर कोणाला माहित झाले तर त्या स्रीयांना फासावरच देण्याची पद्धती होती.

हा झाला पुर्वीचा काळ. आजही काळ बदलला नाही. काळ बदलू पाहात आहे. परंतू आजचीही पुर्वीची मानसिकता त्या काळाला बदलू देत नाही. आजही स्रीयांना त्या रजस्वला असतांना स्रीयांना मंदिरात जाता येत नाही. आजही स्री जन्माचा विटाळच मानला जातो. आजही स्रीयांच्या भ्रृणांना नष्ट केलं जातं. आजही स्रीयांचे विवाह पुरुष मर्जीनंच होतात. अन् आजही स्रीयांच्या संपत्तीवर पुरुषच हक्क गाजवतात. तिला तिचंच वेतन खर्च करता येत नाही स्वतःवर. मात्र एक बदल झाला, तो म्हणजे सतीप्रथेचा. आज सतीप्रथा अस्तित्वात नाही. परंतू ती प्रथा जरी आज अस्तित्वात नसली तरी आज पतीनिधनानंतर स्रीयांचं सौंदर्य नष्ट केलं जातं. भांगावरचं कुंकू पुसलं जातं. बांगड्या फोडल्या जातात. एवढंच नाही तर जोडवे काढल्या जातात. त्यातच आज पांढ-या साड्यांची पद्धत नसली तरी पतीनिधनानंतर तिचं सारं सौंदर्य हिरावलं जातं. ओष्ठरंग, नेलपालिश सारं नष्ट केलं जातं. ती आजही पतीनिधनानंतर काजळ, पावडर लावू शकत नाही. काजळ पावडर लावून समाजात मिरवू शकत नाही.

आज चौफेर निरीक्षण केलं आणि सर्वेक्षण केलं तर स्रीया प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. तरीही सर्वेक्षणातून मुलींचीच जनन संख्या कमी असलेली दिसते. मुली का कमी झाल्या असा जर विचार केला तर ती संख्या स्री भ्रृणहत्येनं कमी झालेली आहे असं कोणीही म्हणेल. आज देशातील राज्याचे काही भाग सर्रासपणे स्री भ्रृणहत्येचे पापच करीत असलेले दिसतात.

मुळात सांगायचं झाल्यास हे स्री भ्रृणहत्येचे पाप का घडतं. स्रीयांबाबत हा हिन दृष्टिकोण अजूनही समाजात का आहे? आजही स्रीयांना आपल्या पसंतीचा जोडीदार का निवडता येत नाही? आजही अशा आंतरजातीय किंवा प्रेमविवाह करणा-या प्रेमीयुगलांचा विवाह समाज का स्विकारत नाही अन् असे विवाह समाज का मान्य करीत नाही? तसेच आजही रजस्व स्रीयांना मंदिर प्रवेश का नाही? ह्या सर्व बाबी विचार करायला लावणा-या आहेत.

आजही स्री जन्माबाबत उदासीनताच आहे नव्हे तर उदासीनताच दिसून येते. समजा पहिल्या वेळी मुलाचा जन्म झाला तर वाढत्या लोकसंख्येनुसार नसबंदी करुन संख्यावाढीवर नियंत्रण आणलं जातं. परंतू जर पहिले अपत्य मुलगी जर असेल तर नसबंदी केली जात नाही. दुसरं मुल होईपर्यंत वाट पाहिली जाते. दुसरं अपत्य जर मुलगीच झाली तर वाढती महागाई व लोकसंख्यावाढ लक्षात घेता मनात इच्छा नसतांना नसबंदी केली जाते. हीच मानसिकता आज समाजाची होवून बसलेली आहे. मुलगी प्रगतीचा आधार नाही तर मुलगाच प्रगतीचा आधार आहे.मुलगी वंशवेल वाढवीत नाही तर मुलगाच वंशवेल वाढवतो हीच समाजाची मानसिकता....... पण बाबांनो, मुलगीच जर एखाद्या मुलाला पत्नी म्हणून मिळाली नाही तर वंशवेल तरी वाढेल का? याचं उत्तर नाही असंच आहे.

आज पुरुषी मानसिकता बदलविण्याची गरज आहे. ती बदलणार कशी? त्या मानसिकतेला कायदेही बदलवू शकत नाहीत. समाजप्रबोधनही बदलवू शकत नाही. मग ती बदलणार कशी? हा एक यक्षप्रश्न आजही विचारवंतांपुढं उभा आहे. आज हीच मानसिकता बदलायला हवी. तेव्हाच स्री जातीचा उद्धार होईल. पुरुषांना जसा जीवन जगण्याचा अधिकार आहे. तसाच अधिकार हा स्रीजातीलाही आहे. हा विचार पुरुष जातीनं आज अंगीकारण्याची गरज आहे. जेव्हा संपूर्ण पुरुषजात प्रत्येक पुरुषांसह तो विचार अंगीकारेल, तेव्हाच समाज सुधारेल. षुरुष मानसिकताही बदलेल व स्रीयांचा दर्जा सुधारेल. मग प्रत्येक स्रीजातीला ती स्वतः स्वतंत्र्य असल्याचा अनुभव येईल नव्हे तर तिला खरं स्वात्रंत्र्य मिळालं असं वाटेल.

आज ज्याप्रमाणं प्रत्येक पुरुषाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. तशीच गरज आहे प्रत्येक पुरुष असलेल्या भावाची मानसिकता बदलणं. आज अशा प्रत्येक भावाची मानसिकता प्रत्येक स्री असलेल्या बहिणीबाबत बदलल्यास नव्हे तर प्रत्येक स्रीजातीबाबत बदलल्यास समाज परिवर्तन होवू शकते. स्रीबाबत विचार करण्याचा दृष्टिकोण बदलेल. स्रीयांनाही पुरुषांच्या बरोबरीचे समान हक्क मिळतील व हे जेव्हा घडेल, तेव्हाच ती खरी बहिणीला ओवाळणी असेल यात दुमत नाही.

**-अंकुश शिंगाडे, नागपूर**

## संक्षिप्त

### २२ वर्षानंतर जमला मित्राचां गोतावळा जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन



आणि कमाई आहे, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली. कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून माजी मुख्याध्यापक लक्ष्मणराव रोकडे, के.के. फुसे, जी.व्ही.जगताप, आर.एल. फुसे, जे.व्ही. जगताप, चौधरी मॅडम यांची उपस्थिती लाभली. हास्य विनोद, गाणी, गप्पा, फोटोसेशन आणि भोजनामुळे वातावरण आनंदी झाले.

### धोकादायक मुख्य रस्त्यावरील फुटलेल्या जलवाहिणीचे तात्काळ दुरुस्ती करा; नागरिकांची मागणी



**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर /प्रतिनिधी**/गंगापूर शहरातील आंबेडकर चौकात मुख्य रस्त्यावरील फुटलेल्या जलवाहिणीचे तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. आंबेडकर चौकात रस्त्यांची दुर्दशा आणि खड्ड्यांची समस्या पुन्हा एकदा समोर आली आहे. या रस्त्यावर मोठा खड्डा पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. या खड्ड्यामुळे दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. एकीकडे अनेक भागात नागरिकांना मूलभूत समस्या जाणवत आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या रस्त्यावरुन ये-जा करताना वाहनचालकांना खड्ड्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नगरपालिका प्रशासनाबद्दल तीव्र नाराजी आहे. या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्याही वाढत असून, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्य रस्त्यांवर वाहनांचा वेग अधिक असल्याने खड्डा आल्यानंतर वाहनावर नियंत्रण मिळविणे अवघड होते. मुख्य रस्त्यावरील खड्ड्यामुळे नागरिकांना तसेच वाहनचालकांना त्रास होतो. यामुळे, नगरपालिका याकडे गांभीर्याने लक्ष देत रस्त्यामधील फुटलेल्या जलवाहिनीची दुरुस्ती होणार का? प्रशासनाला जाग येणार का? याकडे सर्वसामान्यांची लक्ष लागले आहे.

### जो-पर्यंत सूर्य आणि चंद्र राहतील तोपर्यंत मुनिश्रींचा सन्मान राहील -उपाध्याय श्री विरंजन सागर जी महार-ाज



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती सभाजीनगर/प्रतिनिधी**/ श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर, देशमुख नगर येथे उपाध्याय श्री विरंजन सागर जी महाराज यांच्या मंगल सान्निध्यात आज सरस्वती मात-ाजीची आराधना आयोजित करण्यात आली. या प्रसंगी भगवानाचा अभिषेक, शांतिधारा तसेच सरस्वती महामंडल विधानाचे आयोजन करण्यात आले.

उपाध्याय श्रींनी माँ सरस्वतीची हीलिंग दिली तसेच समाजातील चातुर्मास समितीतील कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. चातुर्मास काळात ज्यांनी मुनिश्रींची सेवा केली त्या सर्व श्रावक-श्राविकांचा देखील सन्मान करण्यात आला.सभा प्रसंगी उपाध्याय श्रींनी सांगितले की या वर्षीचा वर्षायोग निर्विघ्न आणि सानंद संपन्न झाला आहे. श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर समिती, महिला मंडळ, युवा मंडळ, बहु मंडळ तसेच संपूर्ण जैन समाज, छ. संभाजीनगर यांनी मिळून जिनधर्माची माहिती आणि धर्मप्रभावना केली. सर्वांनी एकत्र येऊन धर्ममय वातावरण निर्माण केले.

मुनिश्रींनी आपल्या प्रवचनात सांगितले की, साधूंची सेवा हीच धर्मप्रभावना आहे. समाजाने नेहमी साधूंचा सन्मान आणि सेवा करत राहिली पाहिजे. जोपर्यंत सूर्य आणि चंद्र राहतील तोपर्यंत मुनिश्रींचा सन्मान राहील आणि जोपर्यंत मुनिश्रींचा सन्मान राहील तोपर्यंत हिंदुस्तान राहील. कारण साधूंचा सन्मान म्हणजेच धर्माचा सन्मान होय.

# पिशोर पोलिसांचे मोठी कारवाई अवैध दारुचे बॉक्स वाहतूक करणाऱ्याला पाठलाग करुन घेतले ताब्यात

**(पोलीस ठाणे पिशोर पोलीसांची कारवाई १,७०,०४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त)**

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड /प्रतिनिधी**/कन्नड तालुक्यातील पिशोर ठाण्याच्या हद्दीतील देवपुळ येथील अशोक शंकर घुगे हे ३५,०४०/- रु. किंमतीचे देशी दारु संजीवनी संत्राचे ०६ बॉक्स हे १,३५,०००/- रुपये किंमतीची सिल्वर रंगाची मारोती-८०० कंपनीची कार क्रमांक एम.एच. १४ बी.सी. २६५० यामध्ये वा-हतुक करत असतांना, पिशोर पोलीसानी कारचा पाठलाग करुन एकुण १,७०,०४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन, आरोपीस ताब्यात घेऊन, गुन्हा दाखल केला आहे दि. २५/१०/२०२५ रोजी सकाळी ०६.०० वा. अशोक शंकर घुगे रा.देवपुळ ता. कन्नड हा ना-चणवेल कडुन पिशोर मार्गे देवपुळ कडे एका मार-ोती कंपनीची कार क्रमांक एम.एच. १४ बी.सी. २६५० मध्ये अवैधरित्या बेकायदेशीररित्या देशी दारुच्या बाटल्यांचे बॉक्स घेऊन वाहतुक करीत जाणार आहे. अशी गुप्त बातमीदाराकडुन माहिती प्राप्त झाली होती.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पिश-ोर नाक्यावर पिशोर पोलीसांनी तात्काळ नाकाबंदी लावुन, सिल्वर रंगाची मार-ोती-८०० कंपनीची कार क्रमांक एम.एच. १४ बी.सी. २६५० हिला थांबविण्याचा इशारा केला परंतु न थांबता पळशी मार्गे देवपुळ गांवाकडे सुसाट वेगाने जात असतांना पिशोर पोलीसांनी त्याचा पाठलाग केला. त्यानंतर अशोक शंकर घुगे यांनी कार मधील ३५,०४०/- रुपये किंमतीचे ०६ देशी दारु संजीवनी संत्राच्या बॉटल असलेले खाकी रंगाचे बॉक्स हे आश्रुबा रखमाजी घुगे रा. देवपळ यांच्या मालकीच्या देवपुळ शिवारातील शेताच्या बांधावर फेकुन देत असतांना मिळुन आले.

कारवाईमध्ये मिळुन आलेले खाकी रंगाच्या ०४ बॉक्स मध्ये २३,०४०/- रुपये किंमतीच्या



१८० एम.एल.च्या १९२ बॉटल तर ०२ बॉक्स मध्ये १२,०००/- रुपये किंमतीच्या ९० एम.एल.च्या २०० बॉटल मिळुन आलेल्या आहेत.

देशी दारु संजीवनी संत्राच्या बाटल्याची वाहतुक करण्यासाठी गुन्हयात वापरलेली १,३५,०००/-रुपये किंमतीची सिल्वर रंगाची मारोती-८०० कंपनीची कार क्रमांक एम.एच. १४ बी.सी. २६५० हि जप्त करुन, पोलीस ठाणे पिशोर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपुर्णा सिंह, सहायक पोलीस अधीक्षक श्रीमती अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पिशोर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे पोलीस उप निरीक्षक रतन डोईफोडे, पोलीस हवालदार विलास सोनवणे, कौतिक सपकाळ, गणेश कवाळ व पवन खंबाट यांनी केली कारवाई

## महेबुबखडा आगाठाण परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडल्याने कापूस आणि मक्का पिकांचे मोठे नुकसान

**मंडळ अधिकारी व तलाठी यांना अद्यापही वेळ नाही शेतकऱ्याच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तहसीलदारांनी याकडे लक्ष देण्याचे गरज .**

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर /प्रतिनिधी/**
गंगापूर तालुक्यात वैजापूर मतदार संघात वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे आगाठाण,महेबुबखेडा ,भागांतील गट नंबर ४३, या शेतकऱ्याचे मका आणि अनेक शेतकऱ्याचे कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके आडवी पडून भिजली आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने शेतकऱ्यांना आता पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे दोन दिवसा-पूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यासह अति मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला आहे या पावस-ाने कापूस आणि मका पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेचे शेतकरी हिरालाल पटरे यांनी सांगितले आता शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.अनेक शेतांमध्ये कापूस आणि मका पिके वादळी वाऱ्यामुळे पूर्णपणे आडवी पडली आ-हेत. कापसाच्या फुलपांद्या तुटल्या असून, त्या आडव्या झाल्या आहेत. आणि शेतरस्त्यांचे पाणी शे-तात शिरल्याने कापसाचे पीक पिवळे पडून ते खराब होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. उभ्या पिकांचे असे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल



झाले आहेत.या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची तातडीने दखल घ्यावी अशी मागणी. शेतकरी हिरालाल पटरे यांनी केली आहे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांचे तात्काळ पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाईची रक्कम लवकरात लवकर द्यावी, असे आवाहन त्यांनी प्रशासनाकडे केले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या या नुकसानीची गंभीर दखल घेऊन त्यांना आर्थिक मदत करावी, तलाठी यांनी लवकरात लवकर पंचनामे करून घ्यावे अशी मागणी शेतकरी करीत आहे.

### शेतकरी संकटात, तर आमदार रमेश बोरणारे यांचे दिवाळीनिमित्त फराळ व स्नेहभोजन



**आत्ताच एक्सप्रेस**
**वैजापूर/प्रतिनिधी**/गंगापूर तालुक्यात शेतकरी संकटात, तर आमदार रमेश बोरणारे यांचे दिवाळीनिमित्त फराळ व स्नेहभोजन कार्यक्रम वैजापूर गंगापूर तालुक्यात दुष्काळात शेतकरी होरपळत असताना वैजापूर गंगापूरचे आमदार रमेश बोरणारे यांनी मात्र आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुकीचे चित्र डोळ्यासमोर ठेवून वैजापूर शहरातील मुरारी पार्क येथे कार्यकर्ते शिवसैनिक पुढारी भावी जिल्हा परिषद सदस्य नगरसेवक पंचायत समिती सदस्य यांच्यासाठी दीपावलीचे निमित्त करून फराळ व स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता राज्यात भाजपच्या खांद्याला खांदा लावून सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेना शिंदे गट व फडणवीस सरकारने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी सरसकट शेतकऱ्यांच्या बचत खात्यात नुकसान भरपाईचे पैसे टाकण्याचे घोषित केले होते मात्र शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिवाळी होऊन तीन दिवस उलटले तरी शेतकऱ्याच्या बचत खात्यात एक दमडीही सरकारने टाकलेली नाही उलट आमदार रमेश बोरणारे यांनी दिवाळीनिमित्त निवडणुका डोळ्यासमोर ठेवून फराळ पार्टीचे आयोजन म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याचे शेतकरी बोलत आहे.

### विधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड /प्रतिनिधी /**
शहरातील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय नांदेड येथे



भारताचे माजी राष्ट्रपती,भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती महाविद्या लयाच्या प्राचार्या डॉ.विना पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि उपस्थित विद्यार्थी यांनी सर्वप्रथम प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.त्यानंतर ग्रंथपाल डॉ. राजीव वाघमारे यांनी वाचन प्रे-रणा दिन साजरा करण्यामागची महत्त्वाची भूमिका व्यक्त केली व प्रत्येकाच्या जीवनात पुस्तक वाचनाचे महत्व विषद करीत माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात पारंपारिक संतुलित वाचन करावे असे आव्हान केले. प्रस्तुत वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संस्कृती वृध्दिंगत व्हावी या उद्देशाने ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथालयातील चालु वर्षातील अद्यावत माहिती देणाऱ्या नियतकांलिकांचे प्रदर्शन सुध्दा आयोजित करण्यात आले हो-ते. यावेळी उपस्थित सर्वांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला.तसेच डॉ.कलाम यांच्या स्मृतीस उजाळा मिळावा,विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची प्रेरणा मिळावी म्हणून महाविद्यालयाच्या टेलीग्राम या सामाजिक प्रसार माध्यमातुन डॉ.ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याची माहिती व वाचना-चे आयुष्यातील सकारात्मक फायदे या विषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्या डॉ.विना पाटील यांनी ग्रंथालया तर्फे आयोजित प्रदर्शनाला सर्वांनी भेट द्यावी आणि अवांतर वाचनासाठी दैनदिन जीवनातील किमान एक तास द्यावा असे आव्हाण केले.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लक्षात घेता,मतदार यादीतील बोगस नावे तातडीने तपासा

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/**
आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका २०२५ लक्षात घेता, मतदार याद्यांमधील शुद्धतेचा प्रश्न गंगापूर तालुक्यात गंभीर बनला आहे. काँग्रेस पक्षाने प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणात दुबार तसेच बोगस नावे असल्याचा आरोप करत तहसील कार्यालयात सोमवारी तहसीलदार यांना निवेदन सादर केले. पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष सूर्यकांत गरड पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा अर्ज देण्यात आला. दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीवर आक्षेप नोंदवताना काँग्रेसने स्पष्ट केले की, बोगस व पुनरावृत्ती झालेल्या नोंदींची तातडीने सखोल तपासणी करून अंतिम यादीत त्यांचा समावेश होऊ नये. मतदान हक्क हा लोकशाहीचा कणा असल्याने मतदार याद्यांतील त्रुटीमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका काँग्रेसने मांडली. याद्यांतील अनियमितता दुरुस्त न झाल्यास कायदेशीर मार्गाचा अवलंब केला जाईल, असेही पक्ष पदाधिकारी म्हणाले.

निवेदनाची तत्काळ दखल घेत तहसील कार्यालयाने संबंधित पर्यवेक्षक आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना गंगापूर तालुका काँग्रेस समितीची तहसीलदारांकडे मागणी मतदार याद्यांचे वस्तुनिष्ठ परीक्षण करून दुरुस्ती करण्याचे आदेश दिले



आहेत. तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी मतदार यादीतील प्रत्येक नोंदीची तपशीलवार पडताळणी होणार असल्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, प्राप्त आक्षेपांची नोंद घेत प्रारूप यादीत आवश्यक ते बदल करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. काँग्रेस तालुकाध्यक्ष सूर्यकांत गरड पाटील यांनी मतदार यादीतील शुद्धता ही लोकशाही व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाची अट असल्याचे नमूद केले. दुबार व बोगस नोंदी राहिल्यास निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होईल.

प्रशासनाने पारदर्शकता आणि प्रामाणिकतेला प्राधान्य देत निष्पक्ष भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आगामी निवडणुकीपूर्वी या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

तालुक्यात निवडणूकपूर्व चढाओढीचे वातावरण तयार होत असताना मतदार याद्यांतील शुद्धतेचा प्रश्न आता राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. प्रशासनाच्या पुढील कारवाईवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भात हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा माजी विद्यार्थी यांचकडून झाडे लावण्याचा उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**आडगाव बुद्रुक/प्रतिनिधी/**
फुलंब्री तालुक्यातील निधोणा येथील प्रभात हायस्कूल निधोणाच्या वर्ष २०१०आणि २०१५ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शाळेच्या प्रांगणात आनंदी आणि उत्साही वातावरणात शनिवारी (ता. २५) पार पडला. यावेळी या कार्यक्रमात सुरुवातीला महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि ज्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

त्या नंतर शाळेतील काही शिक्षक व विद्यार्थी यांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.नंतर स्नेह मेळा-वा निमित्ताच्या भेटीत सर्व मित्र-मैत्रिणी अनेक वर्षांनी एकत्र आले आणि त्यांनी शालेय जीवनातील गोड आठवणींना उज-ाळा दिला.

कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना आदरपूर्वक स्मरून, जुन्या दिवसांची आठवण ताजी केली. या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन शाळेच्या प्रगतीसाठी भविष्यात योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. या भेटीमुळे विद्यार्थी बंध पुन्हा एकदा मजबूत झाल्याची भावना सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून आली. माजी विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत फोटोसेशन करून आनंद व्यक्त केला.

त्या नंतर शाळेच्या आवारात माजी विद्यार्थी व शिक्षकवृंद यांच्या वतीने विविध प्रकारचे झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.प्राचार्य



पिंपळे सर,व प्राचार्य पांढरे सर, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राजळे सर, राऊतराय सर, बी गाडेकर सर, एस गाडेकर,वैष्णव सर,साळवे सर ,शिवाजी सर,रघुनाथ सर आणि सर्व माजी विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार शुभम जगताप यांनी केले तर आभार अनंता गाडेकर यांनी केले.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस



# संक्षिप्त

## सावळदबारा परिसरात जोरदार पाऊस झाला कापूस ओलाचिब झाला

**नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते करित आहेत**



**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा/ प्रतिनिधी/** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात जोरदार पाऊस झाला शनिवारी दुपारी जोरदार पाऊस झाला. या पावसाने शेतात पाणीच पाणी झाल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.शनिवारी जोरदार पाऊस झाल्याने शेतात सर्वत्र पाणी झाल्याने साचलेल्या पाण्यात मका, कापशी, सोयाबीन, आदी पिकाचे ओलाचिब झाले आहेत चारा भिजल्याने खराब झाला असून, जनावरांच्या चाराचा प्रश्न निर्माण झाला आहे याशिवाय कपाशी पिकाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सावळदबारा सह परिसरात पाऊस झाला आहेत दिवाळीच्या दिवशी टिटवी परिसरात पाऊस झाला होता लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते,व शेतकरी करित आहेत.

सावळदबारा परिसरात जोरदार पाऊस झाला शनिवारी दुपारी जोरदार पाऊस सावळदबारा परिसरात झाला आहे त्यामुळे कापूस ओलाचिंब झाला आहे तर काही ठिकाणी चारा सुद्धा भिजल्यामुळे खराब झाला आहेत जोरदार पाऊस झाला त्यामुळे कापूस ओलाचिंब झाल्यामुळे नुकसान झाले. नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व शेतकरी करीत आहेत.

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते पाणी पिऊन विजय चव्हाण यांनी सोडले उपोषण



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना, (प्रतिनिधी)** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी विजय चव्हाण हे जालना येथे आमरण उपोषणाला बसले होते. त्याअनुषंगाने आज राज्य सरकारच्या शिष्टमंडळ राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे आणि मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी श्री. चव्हाण यांची भेट घेवून त्यांच्या मागण्याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळाने उपोषणककर्ते विजय चव्हाण यांच्या मागण्यांवर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. तसेच त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते श्री. चव्हाण यांनी पाणी पिऊन आपले आमरण उपोषण स्थगित केले.यावेळी आमदार अर्जन खोतकर यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## एमआयडीसीतील विकास कामांचा डिपीआर तयार करावा- पालकमंत्री पंकजा मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना, (प्रतिनिधी)** जालना शहरातील एमआयडीसी परिसराचा (औद्योगिक वसाहत) सर्वांगिण विकासाकरीता डिपीआर तयार करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी एमआयडीसी अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत पालकमंत्री श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, एमआयडीसीचे क्षेत्र व्यवस्थापक, सौ.सुषमा नगरदेवळेकर, सहाय्यक अभियंता मस्तान शहा, प्रमुख भूमापक रमेश डोईफोडे आणि उद्योजकांची उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, जालना येथील औद्यागिक वसाहतीमध्ये अनेक मोठ्या औद्योगिक संस्था कार्यरत आहेत. परंतू याठिकाणी आवश्यक रस्ते, पार्किंग, सुरळीत वीज पुरवठा आदी सुविधा नाहीत. याकरीता औद्योगिक वसाहतीत विविध विकास कामे व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एमआयडीसीने लवकरात लवकर डीपीआर तयार करावा. एमआयडीसीच्या ४ थ्या फेजकरीता जागा पाहून प्रस्ताव सादर करावा. लवकरच याबाबत उद्योग विभागात बैठक लावून उद्योजकांचे प्रश्न मार्गी लावण्यात येतील असे सांगितले.

यावेळी उद्योजकांच्या संघटनेने औद्यागिक वसाहतीतील रस्ते, स्ट्रीट लाईट, ट्रक पार्कींग, ड्रेनेज व्यवस्था, जुना बायपास रस्ता, सीटी बस सुरु करणे, मल्टीपार्क बाबत, बायपासच्या टप्पा-३ जवळ उड्डानपुल आदी मागण्या सादर केल्या.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला विविध विषयांचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना, (प्रतिनिधी)** अतिवृष्टीमुळे अथवा पुरांमुळे बाधित झालेला जिल्ह्यातील एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा बैठकीत दिल्या.जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, जि.प. चे अति मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी श्रीमती मुंडे म्हणाल्या, अतिवृष्टीमुळे अथवा पुरांमुळे शेती पिकांचे नुकसानाचे सविस्तर पंचनामे सर्व्हे करुन, सादर केलेल्या अहवालानुसार जिल्ह्यासाठी मागणी करण्यात आलेले अनुदान ३ ते ४ दिवसात उपलब्ध होईल. तसेच अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत निधीची मागणी करण्यात यावी.

तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जीवनावश्यक बाबींसाठी जिल्हा नियोजन अंतर्गत निधी उपलब्ध करुन विविध विकासकामे करण्यात येणार आहे. यामध्ये अंगणवाडी, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी यांच्याकडे जाणाऱ्या रस्त्यांचे काम प्राधान्य करण्यात येणार आहे. याबरोबरच पुरामुळे गावामधील अनेक जमीनी वाहून गेल्याने शेतकऱ्यांना रोजगार मिळण्यासाठी जमीन खोलीकरण व रुंदीकरणाची कामे रोजगार हमी योजनेतून केल्यास लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.




तसेच बंधारा दूरुस्ती, ओढे, नदी-नाले यांचे खोलीकरण, वीजेचे अनेक पोल पडलेले असून त्याची दुरुस्तीची कामे, शाळा खोल्यांची दूरुस्ती करणे, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील चौकाचौकात सोलार हायमॅक्स लाईट लावून गावातील चौक प्रकाशित करणे असे विविध विकास कामे पालकमंत्री आणि आमदार निधीतून करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेचे तयारी करता यावी, याकरीता नाविन्यपूर्ण योजनेतून प्रत्येक तालूक्यात विविध सोयी सुविधा असलेले वाचनालय तसेच अभ्यासिका तयार करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. जालना शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता तसेच सुशोभीकरणांसाठी फेस लिफ्ट उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे. या उपक्रमातंर्गत शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण, चौकांचे सुशोभिकरण, उद्यान तयार करणे, तलावाशेजारी वॉकींग ट्रॅक तयार करणे आदी विविध विकासकामांचा समावेश असणार असल्याची माहिती यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिली.

जिल्ह्यात नुकतीच पोलीस पाटील भरती प्रक्रिया पार पडली असून या भरती प्रक्रियेतून ५५४ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती प्रकिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पाडली याकरीता श्रीमती मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन केले.प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे विविध विषयाची माहिती सादर केली. यावेळी बैठकीस विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

# समाजसेवी रोहित पाचफुले यांना राष्ट्रीय स्तरावरील 'देश रतन' पुरस्कार जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी /** समाजकार्य, जनजागृती आणि वंचित घटकांच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असणारे जालना येथील सामाजिक कार्यकर्ते रोहित मनोजराव पाचफुले यांची केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत भारती युवा वेलफेयर असोसिएशनतर्फे प्रतिष्ठेच्या 'देश रतन पुरस्कार २०२५' साठी निवड झाली या निमित्ताने जालनाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. २३ डिसेंबर रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित राष्ट्रीय सन्मान सोहळ्यात देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

'रिअल हीरोज ऑफ इंडिया' या उपक्रमांतर्गत देशभरातील ग्रामीण व झोपडपट्टी क्षेत्रात समाजाभिमुख काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान केला जातो. यंदा या श्रेणीमध्ये देशातील अनेक दावेदारांमधून रोहित पाचफुले यांच्या सातत्यपूर्ण व प्रभावी समाजकार्याची दखल घेण्यात आली आहे.

या सोहळ्यात केंद्रीय खाद्यप्रक्रिया मंत्री चिराग पासवान, कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी, सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उत्तर प्रदेशचे रोजगार मंत्री रघुराज सिंह, भाजपाचे ज्येष्ठ नेते श्याम जाजू, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री खा. जगदंबिका पाल, मध्य प्रदेशचे खासदार शंकर लालवानी, बिहारचे खासदार जनार्दन सिंह सिग्रीवाल, तसेच भाजपाच्या संशोधन व धोरण विभागाचे राष्ट्रीय सह-प्रभारी विनय चौधरी आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या गौरवाबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना रोहित पाचफुले म्हणाले, समाजकार्याचे बाळकडू लहानपणापासूनच घरातून आजोबा ह. भ. प. निवृत्तीराव महाराज पाचफुले यांच्याकडून मिळत आले आहे आणि समाजकार्यामध्ये उभारी घेण्यासाठीचे मार्गदर्शन आमचे नेते भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्याकडून मिळत असते. हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून तो प्रत्यक्षात समाजातील प्रत्येक सहकाऱ्याचा, ज्येष्ठ मार्गदर्शकांचा आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या हजारो कुटुंबांचा आहे. वंचित, उपेक्षित आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या जीवनात प्रकाशाचा छोटासा किरण निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने करत आलो आहोत. हा पुरस्कार म्हणजे त्या प्रयत्नांना मिळालेली मान्यता आहे. नवी दिल्लीतील राष्ट्रीय व्यासपीठावर देशाच्या संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते हा सन्मान स्वीकारण्याचे भाग्य लाभत आहे, ही माझ्यासाठी जबाबदारी आणखी वाढवणारी बाब आहे. समाजासाठी कार्य करण्याचा माझा संकल्प आज पूर्वीपेक्षा अधिक दृढ झाला असल्याचे ते म्हणाले.

देश रतन पुरस्कार जाहीर झाल्यानंतर सर्व स्तरांतून रोहित पाचफुले यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नुकत्याच झालेल्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्या विमलताई आगलावे, भाजपा महानगर अध्यक्ष भास्करराव दानवे, माजी आमदार कैलाश गोरंट्याल, भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, युवा नेतृत्व प्रतीक दानवे, जालना जिल्हा व्यापारी महासंघ अध्यक्ष विनीत सहानी, मर्चंट बँकेचे उपाध्यक्ष अनिल सोनी, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी पुष्पगुच्छ देऊन रोहित पाचफुले यांचा सत्कार केला.

## पैठण लोकशाही न्युजचा चेहरा आनंतात विलीन



**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/प्रतिनिधी/** स्व.सुरेश जनार्दन वायभट वडवाळी गावचे रहिवासी तथा लोकशाही न्युजचा चेहरा पत्रकार श्री सुरेश जनार्दन वायभट यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.डवाळी ग्रामस्थांच्या वतीने तथा प्रेस संपादक सेवा संघ यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली..

# फुफ्फुसांच्या आजारांची तपासणीसाठी रुग्णांनी लाभ घ्यावा - मोरया हॉस्पिटलचा उपक्रम ग्रामीण रुग्णांसाठी वरदान

**आत्ताच एक्सप्रेस/घनसावंगी /प्रतिनिधी/**अलिकडच्या काळात बदलत्या हवामानामुळे, वाढत्या प्रदूषणामुळे आणि जीवनशैलीतील असंतुलनामुळे फुफ्फुसांशी संबंधित आजारांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. दमा, अलर्जी, श्वसनासंबंधी त्रास, छातीतील जळजळ आणि श्वास घेण्यास त्रास अशा अनेक आजारांनी नागरिक त्रस्त होत आहेत. ग्रामीण भागात अशा आजारांवरील तपासणी व उपचारांची सुविधा कमी असल्याने अनेक रुग्ण वेळीच निदान न झाल्याने गंभीर अवस्थेत पोहोचतात. ही गरज ओळखून घनसावंगी येथील सुप्रसिद्ध मोरया हॉस्पिटल तर्फे फुफ्फुस, दमा आणि अलर्जी तपासणी शिबिर हा अत्यंत उपयुक्त आणि जनजागृतीपर उपक्रम हाती घेण्यात आला आहे.या उपक्रमात मुंबई येथील प्रसिद्ध छाती रोग, दमा व अलर्जी तज्ञ डॉ. अक्षय चव्हाण हे स्वतः रुग्णांच्या सेवेसाठी उपस्थित राहणार आहेत. डॉ. चव्हाण हे फुफ्फुस व श्वसनविकार तज्ञ म्हणून ओळखले जात असून त्यांनी देशातील अनेक नामांकित रुग्णालयांत काम केले आहे. ते दर महिन्याच्या चौथ्या रविवारी मोरया हॉस्पिटल, घनसावंगी येथे उपस्थित राहून ग्रामीण रुग्णांची तपासणी करणार आहेत.या तपासणी शिबिरात सतत सर्दी-खोकला होणे, छातीत शिट्टीसारखा आवाज येणे, दम लागणे, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत दुखणे, सतत बेडका येणे किंवा रक्तासह बेडका येणे, तसेच झोपेत घोरणे किंवा श्वास अडकणे यांसारख्या आजारांचे सखोल निदान केले जाणार आहे. यासाठी आवश्यक असलेल्या सर्व आधुनिक तपासण्या व उपचारांची सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे.ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना शहरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये तपासणीसाठी जाणे खर्चिक आणि अवघड ठरते. ही समस्या ओळखून डॉ. गंगाधर धांडगे व रवींद्र धांडगे यांनी मोरया हॉस्पिटलच्या माध्यमातून अत्याधुनिक उपचार सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे घनसावंगी तालुक्यातील आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.फुफ्फुसांच्या आजारांबद्दल जनजागृती निर्माण करणे, त्यांचे लवकर निदान करणे आणि योग्य उपचार करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सध्या हवेची गुणवत्ता झपाट्याने खालावत असून, धूम्रपान आणि औद्योगिक प्रदूषणामुळे फुफ्फुसांचे आजार वाढत आहेत. वेळेवर तपासणी न झाल्यास हे आजार जीवघेणे ठरू शकतात. त्यामुळे नियमित तपासणी आणि आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले आहे.मोरया हॉस्पिटलच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, या आरोग्यदायी उपक्रमाचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या फुफ्फुस आरोग्याची काळजी घ्यावी. वेळेवर तपासणी म्हणजेच उपचाराचा पहिला टप्पा, असे आवाहन करण्यात आले आहे.फुफ्फुसांचे आजार वाढत असून ग्रामीण रुग्णांना शहरात जाणे अवघड होते. त्यामुळे मोरया हॉस्पिटलतर्फे तज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देत आहोत. या उपक्रमाचा अधिकाधिक रुग्णांनी लाभ घ्यावा, हीच आमची अपेक्षा आहे.

**-डॉ. गंगाधर धांडगे**
**घनसावंगी**

**ग्रामीण भागातील रुग्णांना शहरातील रुग्णालयांमध्ये जाऊन तपासणी करणे अनेकदा अवघड आणि खर्चिक ठरते. याचा विचार करून मोरया हॉस्पिटलच्या माध्यमातून आम्ही फुफ्फुस, दमा आणि अलर्जीच्या तपासणीसाठी तज्ञ डॉक्टरांची सेवा ग्रामीण रुग्णांसाठी उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमामुळे वेळेवर निदान आणि उपचार शक्य होतील, जे रुग्णांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आमचा आग्रह आहे की, जास्तीत जास्त रुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या फुफ्फुसांचे आरोग्य काळजीपूर्वक सांभाळावे.**

**-डॉ रवींद्र धांडगे**
**घनसावंगी**

# परतुर शहर भाजपाची, नगरपालिकेच्या निवडणूक पार्श्वभूमीवर बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर/प्रतिनिधी** /येणाऱ्या नगरपालिका निवडणुका मध्ये भारतीय जनता पार्टीचा झेंडा परतूर नगरपालिकेवर फडकवण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी कंबर कसून कामाला लागण्याचे आदेश माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर शहरातील भाजपा कार्यकर्त्यांना दिल. येणाऱ्या निवडणुकीमध्ये आपण केलेला विकास, भविष्यातील नगरपालिकेच्या विकासाच्या संकल्पना घेऊनच भाजपा निवडणुकीला सामोरे जाईल असे सांगतानाच जाग धर्मपंथ यापलीकडे जाऊन शहराच्या विकासासाठी भारतीय जनता पार्टी या निवडणुकीत उतरणार असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, गेल्यावेळी निसटता पराभव आपल्याला फसवावा लागला होता मात्र यावेळी निश्चितच परतूर शहरातील जनतेचा कल भारतीय जनता पार्टीच्या बाजूने असून आपण परतूर शहरात केलेली ७०० कोटी रुपयांची विकास कामे सर्व जनतेला माहीत असून त्यामध्ये रेल्वे लाईन वरील उड्डाणपूल ५५ कोटी रुपये, परतूर शहराचे पाणीपुरवठा योजना ५६ कोटी रुपये, सांडपाणी व्यवस्थापन ( भूमिगत गटार), नाट्यगृह १७, कोटी रुपये, उपजिल्हा न्यायालय १९ कोटी रुपये , मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह १० कोटी रुपये , अशा प्रकारची विकास कामे आपण केलेली असून, शहरातील मुख्य रस्ता गणपती मार्ग, या सर्व रस्त्यांची कामे दर्जेदार झालेली असून, काही भागातील अंतर्गत रस्त्यांची कामे बाकी असून ती कामे लवकरच पूर्ण होणार आहेत तर येत्या ३० तारखेला शहरातील बस स्टॅन्ड कडे जाणारा रस्ता, टेलिफोन ऑफिस ते शेगाव पंढरपूर दिंडी मार्गापर्यंत चा रस्ता या रस्त्यांसह अनेक अंतर्गत रस्त्यांची १५ कोटी रुपयांच्या कामाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचे यावेळी बोलताना आमदार लोणीकर यांनी सांगितले.पुढे बोलताना ते म्हणाले की नगरपालिकेमध्ये सत्ता आल्यास परतूर शहराच्या विकासाचा उर्वरित अनुशेष भरून काढण्यासाठी आपण समर्थ असल्याची यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. दरम्यान दरम्यान शहरातील पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीविषयी आमदार बबनराव लोणीकर यांच्याशी मनमोकळेपणाने चर्चा करून




निवडणुकीसाठी सज्ज असल्याचे सांगितले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रभाग निहाय आढावा घेत उमेदवारांची चाचपणी करत योग्य उमेदवारांना संधी दिली जाईल असेही यावेळी सांगितले.यावेळी भगवान मोरे दया महाराज काटे श्रीरंग जयद ओम मोर भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघन कणसे शहराध्यक्ष प्रवीण सातोनाकर, संदीप बाहेकर गणेश पवार प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, शहाजी राक्षे सुबोध चव्हाण बालाजी सांगोळे, दिनेश होलानी संभाजी घनवट अर्जुन जगताप,सावता काळे श्रीधर डोंगरे, संतोष हिवाळे, इंद्रजीत हिवाळे नरेश कांबळे गोविंद मोर डॉक्टर स्वप्निल मंत्री अमर बगडिया राजेंद्र मुंदडा आनंद कोटीच्या संतोष कारके, मुज्जू कायमखानी मलिक कुरेशी आली भाई विजय यादव विलास बोडखे सोनू अग्रवाल ज्ञानेश्वर जईद दगडूबा घोडे श्री कार्लेकर, विशाल पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813